

नोंदणी क्र. ए-६३५/१९६७, अहमदनगर

# श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे

## ( श्रीक्षेत्र मोहटादेवी )

ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर पिन -४१४ १०२

**Email :-** jagdambadevi@gmail.com

# निवीदा क्र.        .

# मंडप कामाची निवीदा

**फॉर्म फी रू. १०००/- , बयाणा रक्कम रू.१००००/-**

निवीदा प्रसिध्द दिनांक १३. ०८.२०२६

**मंडप कामाची  निवीदा**

**मा. अध्यक्ष साहेब** **दि.    /    /२०२६**
**श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट, मोहटे**

| | |
|---|---|
| निवीदाधारकांचे नांव | |
| पत्ता | |
| दुरध्वनी क्र. | |

संदर्भ :- आपले दैनिक सकाळ ( अहिल्यानगर ) व दैनिक पुण्यनगरी वृत्तपत्रातील जाहिरात, देवस्थानचे संकेतस्थळावरील जाहिरात दि. १३ ऑगस्ट २०२६ प्रमाणे.

**विषय : मंडप कामासाठी निवीदा.**

**महोदय,**

श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे देवस्थानच्या उपरोक्त संदर्भीय जाहिरातीस अनुसरून तसेच निवीदेबाबतच्या अटी व शर्तीस अनुसरून व बांधील राहून उपरोक्त संदर्भीय कामांच्या / पुरवठ्यांच्या निवीदा दरपत्रके या पत्रासोबत सादर करीत आहे. माझे मंडपकामे मी विनातक्रार करील याबाबतचा अंतिम निर्णय मा.विश्वस्त मंडळ श्री मोहटादेवी ट्रस्टचा राहील हे मला मान्य व कबुल आहे. कृपया मला सेवा करणेची संधी मिळावी ही नम्र विनंती.

आपला विश्वासू

स्वाक्षरी

**निवीदा धारकाचे संपुर्ण नांव व सही** ( **फर्मचे नांव** )

**शिक्का**

**प्रति,** **दि. /०८/ २०२६**

**मा.अध्यक्ष साहेब,**

श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे

| | |
|---|---|
| निवीदाधारकाचे नांव | |
| संपूर्ण पत्ता | |
| मोबाईल नं. | |
| ई-मेल आयडी | |

महोदय,

**आपले संस्थानचे दैनिक सकाळ, दैनिक पुण्यनगरी या वर्तमानपत्रातील, आपले संकेतस्थळावरील दि.१३ ऑगस्ट २०२६ रोजीचे जाहिरातीनूसार माझे फर्मचे खालीलप्रमाणे सर्वसमावेशक दर देत आहे.**

**<u>मंडप कामाची निवीदा मंडप निवीदा -</u>** कामाचे स्वरुप :- श्री मोहटादेवी गडावर शारदीय नवरात्र महोत्सव २०२६ करिता मंडप व इतर सुविधा पुरवठा व भक्कम व आकर्षक उभारणी करणे.

| **मंडप कामासाठीचे दर तपशील ( विमा, वाहतूक, सर्व कर जोखीम जबाबदारीसह इ.सर्वसमावेशक )** | | | | |
|---|---|---|---|---|
| नं. | मंडप आकार व तपशील | फर्मचे नांव - | | |
| | | ठिकाण | प्रति स्के.फुट / प्रति दिन | एकुण रक्कम रूपये |
| १ | ५० फुट × १४० फुट वॉटरप्रुफ -पत्राशेड, झालरसह, कवी श्री विष्णुदास सांस्कृतिक मंडप येथील तसेच मंडपातील संपूर्ण मॅट झालर व लाईट,फोकससह, भक्कम बांधणीचा मंडप . | भक्ती निवास समोरील पार्किंग कवी विष्णुदास मंडप शेजारी | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | ११५ फुट × ८० फुट ( मंडप झालरी व लाईटसह ) साधा मंडप | भक्तनिवास मधील | | |
| ३ | ५० फुट × १० फुट ( पत्राशेड मंडप झालरसह ) ( भक्तनिवास समोर ) | ओपीडी गाळ्यासमोर | | |
| ४ | वन विभाग चौकी - २० फुट × ४५ फुट वॉटरप्रुफ पत्राशेड, मॅट, झालरसह,स्पिकरसह,लाईटसह, टेबल -२ , खुर्ची- १० नग,प्लॅटफॉर्मसह | निलगिरी गेट | | |
| ५ | पुजाप्रसाद सेंटर - १५ फुट × २० फुट- ३ नग, वॉटरप्रुफ पत्राशेड, झालरसह,स्पिकरसह, टेबल- ३ , खुर्ची - ६ नग, लाईटसह. | नारळ गेट, पुजा प्रसाद सेंटर | | |
| ६ | २० फुट × ६० फुट, झालरसह, स्पिकरसह, टेबल- ३ , खुर्ची - १० नग, लाईटसह. ( साधा मंडप ) | नारळ गेट | | |
| ७ | ७० फुट × ११० फुट ( स्टेजसह ), वॉटरप्रुफ पत्राशेड सह, अत्याधुनिक सांऊड सिस्टीम , झालर, मॅट व लाईट,फोकससह,स्टेज आकर्षक सजावटीसह, मंडपामध्ये पावसाचे पाणी येणार नाही अशा व्यवस्थेस (भक्कम मंडप,१२ फुट उभा पत्र्यासह) समोरील बाजूस पूर्ण वॉटरप्रुफ ताडपत्रीसह ( स्टेज - १५ X२० ) | मंदिरामागील बाजुस | | |
| | | १. पत्रा वॉटरप्रुफचे दर- | | |
| | | २. जर्मन हँगरचे दर - | | |
| | | ३. डोम पध्दतीचा दर - | | |
| | | | | |
| ८ | ५० फुट × ३० फुट वॉटरप्रुफ पत्राशेड सह, संपूर्ण बंदीस्त, लाईट, मॅटसह. | खिचडी स्वयंपाकगृह | | |
| ९ | ३० फुट × ६० फुट वॉटरप्रुफ पत्राशेड सह, संपूर्ण बंदीस्त, लाईट व मॅटसह. | कामगार निवास व्यवस्था | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| १० | दर्शनमार्गावर वॉटरप्रुफ आच्छादन ( पत्राशेड झालरसह ) | | | |
| | १. १२० फुट × ३० फुट ( टी आकार ) | साडी विक्री केंद्र | | |
| | २. १४० फुट × ३० फुट | गोंधळी पॉईट | | |
| | ३. ५० फुट × ३० फुट | गणपतीजवळ | | |
| | ४. १०० फुट × ३० फुट | दत्त मंदिर ते दिपमाळ | | |
| | ५. ६८ फुट × १५ फुट | श्री भगवान बाबा परिसर | | |
| | ६. ६ फुट × ६५ फुट | मंदिर गाभारा दक्षिण व उत्तर बाजू | | |
| ११ | २०'× १०' **२ नग** वॉटरप्रुफ पत्राशेड, मॅट व झालरसह, स्पिकरसह, टेबल-१ व खुर्ची -५ नग प्रत्येकी | खाडे साहेब बंगल्यासमोर, डोंगरे वस्ती | | |
| १२ | १५'× १०' **४ नग** वॉटरप्रुफ पत्राशेड, मॅट व झालरसह, स्पिकरसह, टेबल-१ व खुर्ची -५ नग प्रत्येकी | महादेव फुंदे वस्ती व जूना बाजार वाट, महादेव दहिफळे वस्ती | | |
| १३ | पोलीस चौकी १५'× १०' 3 **नग** वॉटरप्रुफ पत्राशेड मॅट व झालरसह, स्पिकरसह, लाईटसह, ( टेबल -१, खुर्ची - ५ नग ) प्रत्येकी | बीड फाटा कमान, मोहटागाव पालखी रोड रामभाऊ दहिफळे वस्ती | | |
| १४ | पोलीस चौकी १५'× १०' **५ नग** पत्राशेड, मॅट व झालरसह, स्पिकर,लाईटसह ( टेबल -१ , खुर्ची - ५ नग. प्रत्येकी | मोहरी गेट | | |
| १५ | पोलीस चौकी १५'× १०'- **३ नग** पत्राशेड, मॅट व झालरसह, स्पिकर,लाईटसह ( टेबल -१ , खुर्ची - ५ नग. प्रत्येकी | नारळ गेट, हगामा मैदान | | |
| १६ | स्वागत कमान ( बॉक्स टाईप, फ्लेक्स लावण्याच्या मजुरीसह) | ७ नग | | |
| | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | ३०’× १०’, ३०’× ५०’- मल्ल मंडप, स्पिकरसह.<br>( देणगीकरिता टेबल -२, खुर्ची - १० नग ) ( एकदिवस ) | हगामा मैदान | | |
| १८ | पडद्याचे कापडी रूम -१० नग ( जाड कापडासह ) | कॅश कांऊटींग हॉलमध्ये | | |
| १९ | बॅरीकेटस लोखंडी २५० फूट, लाकडी बल्लीचे भक्कम फिटींगसह ५०० फूट - दर्शन रांगेमध्ये व रस्त्यावर वाहतुकीच्या नियोजनासाठी आवश्यकतेप्रमाणे. | ७५० रनिंग फुट अंदाजे<br>पुजा प्रसाद, नारळ गेट,दर्शनमार्ग पार्कींग इ. | | |
| २० | खुर्ची व टेबल | टेबल -२० नग लोखंडी टेबल [ काऊंटरसाठी ] खुर्ची १२० नग | | |
| २१ | मंदिर सभामंडप रंगीत कापडी / झालरीमध्ये डेकोरेशन ( फॉल सिलींगप्रमाणे ) | आकर्षक डिझाईनमध्ये | | |
| २२ | तात्पुरती स्वच्छतागृहे ( मोबाईल किंवा पत्र्यातील ) | एकुण ३० नग विविध ठिकाणी | | |
| २३ | १५०फुट × ६५ फुट मंडप ( मंडप झालरी व लाईटसह ) | भोजनगृह समोरील पार्कींग | | |
| २४ | २४ फुट × १०८ फुट मंडप ( मंडप झालरी व लाईटसह ) | भक्तीनिवास हॉल समोरील पट्टी मंडप | | |
| २५ | पत्रा व बल्ली फिटींगमध्ये बॅरिगेटींग (कठडे) | ५०० रनिंग फुट | | |
| २६ | पत्रा खोली २०’× २०’ दरवाजासह **२ नग** | | | |
| २७ | १००’× १००’ फुट आकारच्या कवी विष्णुदास सांस्कृतिक मंडप शेडमध्ये आकर्षक झालर , मॅट, कीर्तनाकरिता मजबुत स्टेज [ आकर्षक ] साईज २०*३० फुट, सजावटीसह. मोठे कुलर ६ नग, स्टेजवरती मागील बाजुस सजावट महाराजांसाठी आसन व्यवस्था. इ.सह कीर्तन व कथेकरीता दर्जेदार अत्याधुनिक साऊंड सिस्टीमसह अनुभवी ऑप्रेटरसह,संपुर्ण लाईटस व फोकसयासह जनरेटर ६३ केव्हीए. | कवी विष्णुदास सांस्कृतिक मंडप | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २८ | चप्पल स्टॅण्ड करीता वॉटरप्रुफ खोली, मॅट खुर्ची - ०५ नग काऊंटरसह १५*३६ | नारळगेट येथे | | |
| २९ | होम हवन मंडप येथे उत्सव मुर्ती दर्शन व्यवस्था आकर्षक मंडप डेकोरेशन, सिंहासनासह. | श्री मोहटादेवी मंदिर | | |
| | सर्वसमार्वशक दर, कर, विमा, वाहतुक,बांधणी, उतराई इ.सह संपुर्ण कामे रक्कम रु. ) | एकुण रूपये | | |

अक्षरी रक्कम रुपये -

देवस्थानचे मागणी प्रमाणे बदल करणेत येईल. आवश्यकतेनुसार दर्शन रांगेत मंडप व बॅरेकेटींग करून देण्यात येईल. कीर्तन व कथेकरिता आवश्यक क्षमतेचा जनरेटर व्यवस्थेसह. तत्कालीन परिस्थीती पाहता उपरोक्त यादी व्यक्तीरित मंडप, शेडनेट, पडद्याचे कापड, सांऊड सिस्टीम आदि कामे करावी लागल्यास त्यांचे दरपत्रक मंजूर दराप्रमाणे ( प्रो-रेटा ) पध्दतीने सदर असतील ते मला मान्य व कबुल आहेत.

वरीलप्रमाणे अ.क्र. १ ते २८ पर्यंतचे कामाचे प्रति स्केअर फुट व रनींग मीटरचे इ.चे सर्वसमावेशक दर दिलेले आहे. वरील सर्व कामे मी रूपये ____________________/-

( अक्षरी रूपये ---------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------- मात्र रक्कमेस मी उक्ते करण्यास तयार आहे. तरी मला वरीलप्रमाणे काम करण्यास संधी देण्यात यावी ही विनंती. ( सर्व कर / जीएसटी / विमा / पब्लिक लायबेलिटी सर्व बाबी समावेशीत वाहतुक, भराई, उतराई, नुकसान, जबाबदारी इ.इ.सह ) करण्यास तयार आहे. आपले नियम व अटी आम्हास मान्य व बंधनकारक आहेत. याबाबत आपल्या सोबत करारनामा करून दिला जाईल. देवस्थानने दिलेल्या मुदतीमध्ये पूर्ण कामे वेळेत मजबुत, बांधणी, आकर्षक डेकोरेशन इत्यादी सर्व जबाबदारीसह वेळेमध्ये पूर्ण करेल. देवस्थानास कोणतीही अडचण येवू देणार नाही.

**आपला विश्वासू**

**निवीदा धारकाचे नांव व सही ( फर्मचे नांव )**
**शिक्का**

साक्षीदार ( नांव , सही व मोबाईल नंबर )

१. २.

# निवीदाधारकाची माहिती

| नं. | माहिती | तपशील |
|---|---|---|
| १ | निवीदाधारकांचे नांव /<br>फर्मचे नांव | |
| २ | संपर्कासाठी व्यक्तींचे नांव<br>व दुरध्वनी क्रमांक | |
| ३ | पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता | |
| ४ | दुरध्वनी क्रमांक | |
| ५ | ई-मेल आयडी | |
| ६ | आयकर नोंदणी ( पॅन नंबर ) | |
| ७ | आधार क्रमांक | |
| ८ | फर्म नोंदणी क्रमांक | |
| ९ | जी.एस.टी.नोंदणी क्रमांक | |
| १० | बँकेचा तपशील | |
| ११ | खातेधारकांचे नांव - | |
| | बँकेचे नांव - | |
| | शाखा- | |
| | खाते क्र.- | |
| | आयएफएसी कोड- | |
| | खातेदार प्रकार ( चालू / बचत ) | |
| १२ | **ठेकेददारीचे स्वरूप**( भागीदारी / प्रा.लि./ पब्लिक लि.इ. ) सर्टीफिकेट सोबत जोडावे. | |
| १३ | अ. लेबर लायसन्स नंबर | |
| १४ | बयाणा रक्कम तपशील पावती क्र. तपशील<br>**<u>रू.१०,०००/- मात्र</u>** | |

निवीदाधारकांची सही

**-: निविदेच्या शर्ती व अटी :-**

श्री जगदंबा देवी सार्व.ट्रस्ट,मोहटे देवस्थान मार्फत उपरोक्त विषयास अनुसरुन सिलबंद पाकिटामध्ये निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा धारकांनी कृपया खालील बाबी विचारात घ्याव्यात. पुरवठा धारकास बंधन कारक राहितील याची नोंद घ्यावी.

१.उपरोक्त शारदीय शारदीय नवरात्र महोत्सव २०२६ करिता मंडप व इलेक्ट्रीक डेकोरेशन कामाचे स्वरूप, कामाच्या जागेची प्रत्यक्ष पाहणी करावी त्यानंतर कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

२.श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यात अथवा देवस्थानच्या संकेतस्थळावरील उपलब्ध केलेल्या विहीत नमुन्यामधील निवीदा स्विकारल्या जातील.

३.निवीदेमध्ये नमूद कामाचे दर सर्व करांसहित, जीएसटी व इतर सर्व कर व खर्च समावेशक समाविष्ट असावेत.

४.निवीदेमध्ये दर श्री मोहटादेवी गडावर पोहच सह, भराई व वाराईस, विमा, वाहतुक विमा, कर्मचारी अपघात विमा, पब्लिक लायबेलीटी, नैसर्गिक हानी यासह वाहतूक तसेच मंडप उभारणी व काम पूर्ण होईपर्यंत कोणताही याकामामुळे अपघात झाल्यास त्यांच्या भरपाई अथवा नुकसानीची जबाबदारी निवीदाधारकांची असेल याबाबत देवस्थान कोणत्याही स्वरूपात जबाबदार असणार नाही.

५.निवीदाधारकांकडे शासकीय नियमानुसार सर्व परवाने असणे बंधनकारक आहे. झेराक्स कॉपी निविदे समवेत सादर करावेत. याबाबतची जबाबदारी निवीदाधारकांची असेल.

६.इलेक्ट्रीक कामाकरिता निवीदाधारकांकडे आवश्यक तांत्रिक कामाचा अनभुव अथवा प्रशिक्षित व्यक्ती असणे आवश्यक आहे.देवीगडावर जबाबदार व्यक्ती आवश्यक कर्मचारी, हमाल व वाहने पूर्णवेळ असणे बंधनकारक आहे.

७.मंडप व विद्युत रोषणाई कामाकरिता देवीगडावर उपलब्ध असलेल्या कारागीरांचे मोबाईल क्रमांक कार्यालयाकडे देण्यात यावेत. संबंधीत मोबाईल अहोरात्र सुरू राहतील यांची दक्षता घेण्यात यावी.वॉकी टॉकी संच असावेत.

८.मुदतीत न आलेल्या तसेच अपुर्ण निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत. निविदा सिलंबंद पाकीटावर पुरवठादाराचे नाव पत्ता,मोबाईल सह व ईमेल ची नोंद असावी. तसेच कोणत्या वस्तुच्या पुरवठयासाठी निविदा आहे त्याचा स्पष्ट उल्लेख असावा.

९.कमी अथवा जास्त दराची कुठलीही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार संस्थानने राखुन ठेवलेला आहे. त्या बददलचे कोणतेही कारणे देणे देवस्थान व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही. देवस्थानच्या नियम व अटी, जाहिरातीस अनुसरून निवीदा असावी. निवीदाधारकांची निवीदा विनाअट सादर करावी. अटीसह असलेली निवीदा नाकारण्यात येईल.

१०.निवीदाधारकांकडे प्रथमोपचार पेटी, सेफ्टी बेल्टस, हेल्मेट आदि सुरक्षा साहित्य योग्य प्रमाणात व दर्जेदार असावे.सर्व सुरक्षिततेचे शासकीय कायदेप्रमाणे नियमांचे पालन करावे.

११.मंडप उभारणी व इलेक्ट्रीक डेकोरेशनचे काम देवस्थानचे विद्युत विभाग, सिव्हील इंजिनीयर यांच्या मार्गदर्शनानुसार करावे.

१२.मंडपाकरिता पावसाचे पाणी काढण्याची व्यवस्था ठेकेदारास करावी लागेल.

१३.मंडप हा भक्कम आकर्षक व मजबुत असावा.

१४.देवीगडावरील वाऱ्याचा वेग , पावसाचे दिवस, उन यापासून संरक्षण करणारा असावा.

१५.मंडप व इलेक्ट्रीक कामामध्ये सुरक्षेचा अभाव, दर्जाहिन साहित्य किंवा योग्यतेनुसार साहित्य वापरले नसल्यास त्याबाबत तातडीने बदल अथवा दुरूस्ती करून देणे निवीदाधारकावर बंधनकारक राहील.

१६.०निवीदेमधील नमूद मोजमापाप्रमाणे मंडप असावे. कामामध्ये देवस्थानच्या आदेशानुसार वाढीव करावयाची वेळ आल्यास त्याप्रमाणे कामे करून द्यावे लागतील. त्यांची स्वतंत्र रक्कम अदा करण्यात येईल.

१७.शारदीय नवरात्र महोत्सव कालावधीमध्ये अहोरात्र ठेकेदार / अधिकृत प्रतिनिधी देवीगडावर उपलब्ध असावा.

१८.निवीदा मंजूर झाल्यास कामाचे रक्कम देवस्थानचे सिव्हील इंजिनीयर व वायरमन यांच्या अहवालानुसार धनादेशाव्दारे १५ दिवसामध्ये अदा करण्यात येईल. मुळ देयक व मोजमापांसह देवस्थानकडे सादर करावे लागेल. देयकांच्या रक्कमेतून शासकीय नियमाप्रमाणे कपात करण्यात येईल. अग्रीम अदा करण्याबाबत देवस्थानचा निर्णय अंतिम राहील.

१९.निवीदा मंजूर झाल्यास देवस्थान समवेत लेखी करारानामा करून देणे बंधनकारक राहील.

२०.सर्व कामांकरिता योग्य विद्युत जोड, आर्थिंग, इन्शुलेशन, ताण, विद्युत सुरक्षेच्याबाबत आवश्यक सर्व उपाययोजना कराव्यात. व सुरक्षिततेचे साहित्य उपलब्ध ठेवावेत.

२१.वरील नमुद आदेश दिल्यापासुन कार्यआदेश / निवीदा अटीप्रमाणे अथवा खरेदी आदेशात नमुद असलेल्या कालावधीमध्ये देवीगडावर पोहच करणे बंधनकारक राहिल. मुदतीमध्ये संपुर्ण कामे पुर्ण न झाल्यास दुसरया पुरवठादारांकडुन खरेदी करण्याची मुभा / सेवा घेण्याची मुभा देवस्थानास असेल. यास विलंब झाल्यास होणारया नुकसानीस पुरवठादार स्वतः जबाबदार असेल. दिलेल्या मुदतीत कामे  पुर्ण न केल्यास देवस्थानकडे जमा असलेली बयाणा रक्कम जप्त केली जाईल, तसेच योग्य दंडात्मक कारवाई अथवा न्यायालयीन कारवाईस पुरवठादार जबाबदार असेल. विलंबाबद्दल या खर्चाची रक्कम पुरवठादाराकडुन वसुल करण्यात येईल हे निवीदाधारकास मान्य व बंधनकारक असेल.

२२.कवी विष्णुदास सांस्कृतिक मंडप येथील साऊण्ड सिस्टिम मिक्सरसह अत्याधुनिक पध्दतीची व कीर्तन, भजन, गायण, प्रवचन, कथा याकरीता सुमधूर आवाज देणारी व अनुभवी प्रशिक्षीत ऑप्रेटरसह असेल.साऊण्ड सिस्टिममध्ये दोष निर्माण झाल्यास आम्ही तत्काळ पर्यांयी व्यवस्था उपलब्ध ठेऊ तसेच साऊण्ड सिस्टिम योग्य नसल्यास देवस्थान इतर कोणाचीही साऊण्ड सिस्टिमची व्यवस्था करण्याचा सर्वाधिकार असेल याबाबत देवस्थान ठरविल ती रक्कम माझे बिलातून कपात करण्यात येईल.

२३.जनरेटर ६३ केव्हीए क्षमतेचा सुस्थितीतील असेल याकरीता डिझेल देवस्थान मार्फत पुरविले जाईल. याबाबतचे लॉग बुक आम्ही ठेकदार परीपूर्ण नोंदीसह ठेऊ.

२४.संपुर्ण मंडप परिसरातील विद्युत दिवे, ट्युब, फोकस, हे आय एस आय (ISI) मार्क व सुस्थितीतील सुरक्षित असतील त्यास योग्य संरक्षण वायर्स, केबल, जोडणी, अर्थिंग यासह सुरक्षित स्वरुपाचे असेल. त्याची नित्य व नियमीत देखभाल करण्यात येईल. सर्व जोडणी आय एस आय ( ISI ) मार्क वॉटरप्रुफ टेकनिकने जोडल्या जातील. केबल व वायर्स लटकते राहणार नाही अथवा भाविकांना अडथळा होऊ अशा असणार नाहीत.

२५.बॅरिगेटर्स मजबुत बांधणीसह असतील आवश्यकतेप्रमाणे अधिकचे बॅरिगेटर्सची आवश्यकता लागल्यास ती मी उपलब्ध ठेवील.

२६.निविधेतील कामात बदल झाल्यास कमी अथवा जास्त कामाचे साईज इत्यादी वाढल्यास त्याचे दर  हे प्रो-रेटा पध्दतीने असतील व ते मला मान्य असतील.

२७.मी सादर करील दरपत्रकातील दर  हे सर्वसमावेशक असुन  यात  भराई, वाहतूक, उतराई, मजुरी, विमा, सर्वसमावेशक जोखीम, नैसर्गिक आपत्तीची पुर्णतः जबाबदारी, तुटफूट हरवणे यासह  कोणत्याही स्वरुपाच्या हणीस ठेकेदार स्वतः जबाबदार असतील. देवस्थान ट्रस्ट मार्फत नाही याची मला जाणीव व मान्यता आहे. सदर  दरामध्ये सर्वकर [ जोखिम ] यासह समाविष्ठ स्वरुपाचे आहेत.

२८.आमच्या कामात  कसुर अथवा विलंभ झाल्यास देवस्थानास पर्यायी व्यवस्था करुन त्याची  नुकसान भरपाई करुन देण्याची सर्वाधिकार  आहेत. ते मला  मान्य  व कबूल आहेत.
२९.देवस्थानने नियमून दिलेल्या मुदतीमध्ये सर्वकामे आम्ही आकर्षक डेकोरेशन  व मजबुत व भक्कम  बांधणी वेळेवर पुर्ण करुन  देऊ  याबाबत देवस्थानास कोणतीही अडचण निर्माण होऊ  देणार नाही.
३०.सिलंबद निविदा **शुक्रवार दि. २१ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३:०० वा.** श्री मोहटादेवी गडावरील संस्थानच्या कार्यलयात आणून द्यावेत, अगर पाठवावेत. सर्व निविदा / दरपत्रक **रविवार  दि.२३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता** उपस्थित निवीदाधारकांचे समक्ष उघडण्यात येईल. याकरिता आपला अधिकृत प्रतिनिधी यावेळी उपस्थित राहुन देवस्थानने दराबाबत केलेल्या वाटाघाटीसह व अंतिम किंमत ठरविण्यात येईल. उपरोक्त नमुद वेळेत बदल करण्याचे अधिकार देवस्थानने राखून ठेवलेले आहेत.

**३१.    कार्यपूर्ती बाबत -**

| | |
|---|---|
| १. देवीगडावर मंडपाचे साहित्य पोहोच करणे. | दि.०२ ऑक्टोबर २०२६ |
| २.मंदिर व मंदिर परिसरातील मंडप उभारणी | दि.०५ ऑक्टोबर २०२६ |
| २. मंडपाकरिता पत्रा लावणे व मजबुतीकरण | दि.०६ ऑक्टोबर २०२६ |
| ३.कपडे बांधणे, मंडप बांधणे | दि.०७ ऑक्टोबर र २०२६ |
| ४.बॅरागेटींग, आच्छादन    उभारणी | दि. ०८ ऑक्टोबर २०२६ |
| ५. रूम कापडी आवश्यकतेप्रमाणे | दि. ०९ ऑक्टोबर २०२६ |
| ६. **एक दिवसाकरिता** असणारे मंडप | **कार्यक्रमाच्या  एक दिवस आधी.** |
| ७.**मंडप व लाईट व्यवस्था इलेक्ट्रीकल्ससह संपूर्ण काम पुर्ण करणे** | **दि.** ०८ ऑक्टोबर २०२६ |

वरीलप्रमाणे कामे करतांना शासनाचे नियम व प्रचलित कायदे व  देवस्थानचे नियम व अटी व शर्ती मी संपूर्णपणे वाचल्या असून समजून घेतलेल्या आहे. त्या सर्व अटी व शर्ती मला मान्य असून त्या माझ्यावर तसेच माझ्या फर्मवर बंधनकारक आहेत त्यामुळे देवस्थानच्या सर्व सुचनांचे काटेकोरपणे पालन करेल हे शपथेवर सादर करत आहे.

याबाबत कोणताही  वाद निर्माण झाल्यास मा.विश्वस्त मंडळचा सर्वाधिकार असेल तसेच  न्याय कक्षा ही पाथर्डी व  अहिल्यानगर असेल.
कृपया आम्हास  वरीलप्रमाणे संपुर्ण कामे करण्यास संधी द्यावी ही विनंती.

साक्षीदार

( निवीदाधारकांची नाव  व सही )
शिक्का